# ७. मअण-मरणं

१९ व्या शतकातील जैनमुनी विजयकस्तूरसूरी यांनी जैनधर्माचे आचार, सिद्धांत आणि व्यवहार सामान्य लोकांना समजावून सांगण्यासाठी अत्यंत सरळ व सोप्या महाराष्ट्री प्राकृत भाषेत अनेक उपदेशात्मक लोककथा लिहिल्या. या कथांचा संग्रह 'पाइअ-विण्णाण-कहा' या नावाने दोन भागांमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. त्यातील 'मदनाचे मरण' ही लोककथा निवडली आहे.

एका नगरात एक कुंभार होता. त्याची पत्नी भद्रा. भद्रा व महाराणी यांची मैत्री होती. भद्रेजवळ एक गाढवीण होती. कालांतराने गाढवीने श्वेतवर्णाच्या शिंगरुला जन्म दिला. तिने त्याचे नाव मदन ठेवले. त्याच्यावर भद्रेचे पुत्राप्रमाणे प्रेम होते.

एकदा महाराणीची दासी भद्रेचे क्षेम-कुशल विचारण्यास आली तेव्हा भद्रा अंगणात बसून गळा काढून रडत होती कारण त्याच दिवशी 'मदन' मृत्यू पावला होता. तिला बघून कुंभारही रडू लागला. दुरूनच ते पाहून दासीला वाटले भद्रेच्या घरी कोणाचातरी मृत्यू झालेला आहे. दासी शीघ्रतेने गेली व महाराणीला सांगितले. ऐकताच राणीही भद्रेच्या घरी आली व तिच्या शेजारी बसून रडू लागली. हळू-हळू ही बातमी संपूर्ण नगरात पसरली. राजा, प्रधान, मंत्री, सेनापती, कोतवाल, नगरश्रेष्ठी अनेक नागरिक तेथे गेले व रडू लागले. एका वाटसरूने हे पाहिले व विचारणा केली असता कळले, की खरी हकीकत कोणालाच माहीत नव्हती.

शेवटी राणीने भद्रेला विचारले असता असे कळले, की मदनाचा मृत्यू झाला म्हणून ती रडत होती. यावरून असे लक्षात येते, की कोणतीही घटना किंवा वार्ता पूर्णपणे कळली नसेल तर त्याची संपूर्ण सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे अन्यथा अंधानुकरण मूर्खपणाचे ठरते. हा बोध या कथेतून प्राप्त होतो.

कम्मि वि णयरे कुंभारस्स भज्जाए सह णरिंदरण्णीए सहित्तणं अहेसि। कुंभआरभज्जाए एगा गद्दही अईव वल्लहा आसि। गद्दहीए पुत्तो जायइ, किंतु सो जायमेत्तो मरइ। तेण कुंभआरभज्जा सएव झूरेइ। एअया तीए गद्दहीए, पुत्तो संजाओ। सो अईव सेअरूवो अत्थि। तीए तस्सुवरिं बहू णेहो अत्थि, तओ तस्स णामं मअणु त्ति दिण्णं। सा मअणं सम्मं पालेइ, एगंमि वासे जाए समाणे सो वि मअणो मच्चुं पत्तो। तआ सा कुंभआरी अईव रोवइ। तीए रोवमाणीए तप्परिवारो वि रोवेइ। तंमि काले णरिंदभज्जा किंपि कारणत्थं कुंभआरी-गेहे दासिं पेसेइ। सा दासी तत्थ आगया सपरिवारं च कुंभआरिं रुवंतिं दट्ठूण चिंतेइ - 'णूणं इमीए गेहे कोवि मओ, तेण सव्वे रुवंति'।

तया सा दासी सिग्घं तत्तो णिस्सरिअ रण्णिं कहेइ- 'तीए गिहे को वि मरिओ।' तं सुणिऊण सदासी रण्णी कुंभआरीए गेहे गंतूण, रुवंतीए तीए समीवे उवविसिऊण सा रोविउं लग्गा, णरिंदो वि तत्थ महिसीए गमणं सुणिऊण, सो सप्पहाणो तत्थ गओ, पच्छा सेणावई, कोट्टवालो, णअरसेट्ठी, पउरजणा वि गंतूण रोविउं लग्गा। को एत्थ मउ त्ति' केवि ण पुच्छंति, सव्वे रुवमाणा संति।

तइआ तत्थ एको वइएसिओ आगओ, सो अण्णं पउरजणं पुच्छइ - 'को एत्थ मओ'? सो कहेइ - 'अहं मित्तस्स पच्छा आगओ, तेण मम मित्तो जाणेइ।' सो मित्तं पुच्छइ, सो अण्णं दंसेइ, एवं कमेण एएण पउरजणेणुत्तं - 'अहं णअरसेट्ठिणो पच्छा आगओ' णअरसेट्ठी कोट्टवालं, कोट्टवालो सेणावइं, सेणावई पहाणं दंसेइ। पहाणो वि कहेइ - 'णरिंदस्स पच्छा अहं आगओ'। पहाणो णरिंदं पुच्छइ - 'एत्थ को मच्चुं पाविओ'। णरिंदो कहेइ - 'अहं ण जाणामि जओ अहं महिसीए पच्छा आगओ'।



णरिंदो महिसिं पुच्छइ– 'को एत्थ मओ'। सा वएइ– 'अहं ण जाणामि, किंतु दासी जाणेइ'। तया रण्णी दासिं पुच्छइ – 'को एत्थ मच्चुं पाविओ?' दासी कहेइ– अहं ण जाणामि, परंतु तव सहिं कुंभारिं रुवंतिं दठ्ठूण मए उत्तं– 'तव सहीए गेहे को वि मओ'। तया महिसी कुंभआरिं णियसहिं पुच्छइ – 'को तव गेहे अज्ज मओ? सा बोल्लेइ– ''अज्ज मम गद्दहीपुत्तो मअणो णाम बालगद्दहो मओ, बालगद्दहो एसो मम अइवल्लहो आसि, तेणाहं रोवेमि'' एवं मअणस्स मरणं परमत्थं अणच्चा गआणुगइआ सव्वे आगआ समाणा हसणीआ संजाया।

तओ लोगुत्तमे धम्मे सद्धम्मं सम्मं जाणिऊण पयट्टिअव्वं, ण गयाणुगइयत्तणेण।

---

**सद्दत्था**

**भज्जाए –** पत्नीच्या
**सहित्तणं –** मैत्री
**गद्दही –** गर्दभी, गाढवी
**जायमेत्तो –** जन्मत:च
**सेअरूवो–** श्वेत, पांढऱ्या रंगाचा
**मअणो –** मदन (मदन म्हणजे कामदेव, सौंदर्याचे प्रतीक)
**मच्चुं पत्तो –** मृत्यु पावला
**तत्तो णिस्सरिअ –** तेथून निघून
**णरिंदरण्णीए –** राजाच्या राणीचे
**अहेसि –** होते
**सएव –** सदैव
**झूरेइ –** दु:खाने क्षीण होणे
**णेह –** स्नेह
**एगंमि वासे जाए समाणे –** एक वर्षाचा झाल्यावर
**णूणं –** नक्कीच
**सुणिऊण–** ऐकून

**गंतूण** – जाऊन
**महिसीए**– महाराणीचे
**कोट्टवाल** – नगररक्षक
**मउ / मओ** – मरण पावला
**पच्छा** – पश्चात, मागून
**पउरजणेणुत्तं** – पउर + जणेण + उत्तं – नागरिकाने सांगितले
**बालगद्दहो** – छोटे गाढव, शिंगरू
**अणच्चा** – न समजल्याने
**हसणीआ** – हास्यास्पद
**रुवंतीए** – रडत असणाऱ्या
**सप्पहाणो**– प्रधानाबरोबर
**रोविउं** – रडू
**वइएसिओ** – यात्रेकरू, विदेशी
**अण्णं दंसेइ**– दुसऱ्याला दाखविले
**णरिंदस्स** – राजाच्या
**अइवल्लहो** – अत्यंत प्रिय
**गआणुगइआ** – गतानुगतिक, विचार न करता अनुसरणे

## सज्झाओ

**१ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) भद्रा कुंभारिणीची मैत्रीण ........
२) भद्रा कुंभारिणीच्या गाढवाचे नाव ........

**२ पुढील शब्द वापरून प्राकृतात वाक्य तयार करा.**

१) पउर–जणा २) परमत्थ ३) सेअ

**३ रूपे ओळखा.**

| | |
|---|---|
| दट्ठूण | |
| रोवइ | |
| महिसीए | |
| पुत्तो | |
| हसिउं | |

**४ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) अविचारी दासीने राणीस काय सांगितले?
२) कोणतेही कार्य विचारपूर्वक करावे असे का म्हटले आहे?

**५ वर्णविषयक बदल स्पष्ट करा.**

| | |
|---|---|
| मओ | |
| पहाण | |
| मअण | |
| पियसही | |
| अईव | |

❋❋❋